# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## :: परिपत्रक ::

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न पारंपारिक व व्यावसायिक महाविद्यालये व परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे या कार्यालयाचे जा.क्र. उशिंम-शिष्य/वि.आ.प्र./२०२४ रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्चशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांनी उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यार्थ्यांची आधार नोंदणी तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तरी याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या शासकीय, शासन अनुदानित, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना विद्यार्थ्यांची आधारनोंदनी तातडीने करण्याबाबत कळविले आहे.

तेंव्हा विद्यापीठ संलग्नीत शासकीय, शासन अनुदानित, अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये (पारंपारीक व व्यावसायीक) यांनी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करावी.

कळावे.

आदेशान्वये

PSPandw

(डॉ. पी. एस. पांडव)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत :- वरीलप्रमाणे.

No - 1483
15 MAY 2024

G:\All Work Deean Committee, PG Bord & RTI\GST Sub 25.9.2023\CGST SGST Circular 23.4.25.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153

क्र.उशिंस -शिष्य/वि.आ.प्र/2024 दिनांक-.

प्रति,

1.मा. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

2.सर्व विभागीय सहसंचालक ,
उच्च शिक्षण

**विषय -विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत.**

संदर्भ - अल्पसंख्याक विकास विभाग पत्र क्रमांक अविवि-2024/94/प्र.क्र.49/का-6, दिनांक 23.04.2024.

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रानूसार , उच्च व्यावसायिक व इयत्ता 12 वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरुन तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. (सोबत पत्र जोडले आहे.)

तरी या बाबत आपल्या अधिनस्त असलेल्या शासकीय, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित(टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करण्याबाबत कळविण्यात यावे.

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 25-04-2024 12:30:37
**( डॉ. प्रकाश बच्छाव )**
शिक्षण सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे -1

प्रत- अल्पसंख्याक विकास विभाग,हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,मंत्रालय,मुंबई-32 यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन

क्रमांक: अविवि-२०२४/९४/प्र.क्र.४९/का-६
अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८३००३१
ईमेल-desk६.mdd-mh@gov.in

दिनांक - २३ एप्रिल, २०२४.

प्रति,

१) संचालक - तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालीका मार्ग, पत्र पेटी क्रमांक१९६७, मुंबई-४०० ००१.

२) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन सचालनालय, महाराष्ट्र राज्य, ४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय इमारत, फोर्ट, मुंबई .००१ ४००-

३) संचालक, शिक्षण (उच्च शिक्षण) संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१.

४) संचालक, अल्पसंख्याक प्रौढ शिक्षण संचालनालय, १७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

विषय:-- विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करणेबाबत.

संदर्भ:- शा.शि. व क्री.विभाग यांचे पत्र क्र. आधार-२०२४/प्र.क्र.४४/एसडी-१, दिनांक - २.४.२०२४

महोदय,

उपरोक्त विषयावरील शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर पत्रान्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्य शासनाच्या विविध विभागामार्फत मान्यता मिळालेल्या खाजगी शाळा व्यवस्थापनांनी विद्यार्थ्यांची संख्या वाढवून आवश्यकतेपेक्षा अधिक शिक्षक-शिक्षकेतर पदे मंजूर करून घेतली असल्याचे निदर्शनास आले असल्याचे नमूद करून विद्यार्थ्यांची नोंद करताना त्यांच्या " आधार" ची नोंद करणे आवश्यक असल्याचे तसेच विभागामार्फत विविध गटांसाठी शिष्यवृत्तीच्या योजना राबविल्या जातात. विद्यार्थी नोंदणी तसेच शिष्यवृत्तीच्या विविध योजना पारदर्शी पध्दतीने राबविण्यासाठी "आधार" ची नोंद करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या उक्त निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की, उच्च व्यावसायिक व इयत्ता १२वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी (१) संचालक (वैद्यकिय शिक्षण), वैद्यकिय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (२) संचालक, (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. व (३) संचालक, शिक्षण (उच्च शिक्षण) संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-याचेकडून करण्यात येत आहे. सबब,सदर शिष्यवृत्ती योजना ही आपल्यामार्फत राबविण्यात येत असल्याने उच्च व्यावसायिक व इयत्ता १२वी नंतर सर्व अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यार्थ्यांची आधारनोंदणी तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

आपली

(मेघना गौरव शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: वरीलप्रमाणे.

प्रत, निवड नस्ती का-६



Scanned with OKEN Scanne